माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य, माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : २२९/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री. नरेशकुमार स्वरुपचंद जैन,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी, तथा विभागीय वाहतूक अधिकारी,**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा विभाग भंडारा, ता. जि. भंडारा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा विभाग भंडारा, ता.जि. भंडारा

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २९.०३.२०२३**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १४.०२.२०२२ | --- | २७.०७.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. १६२/२०२०,१६३/२०२० दिनांक १४.०२.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २९.०३.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी राज्य परिवहन महामंडळ भंडारा, जि. भंडारा श्री. चंद्रकांत नागोबाजी वडस्कर उपस्थित आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ भंडारा विभाग, भंडारा श्रीमती तनुजा अहिरकर उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. १६२/२०२०,१६३/२०२० मध्ये दिनांक १४.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून " जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर माहिती अर्जातील माहिती निरंक आहे व वरील पत्राचा कसुन शोध घेतला असता, सदर पत्र आढळून आले नाही. कार्यालयात उपलब्ध नसलेली माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आग्रह केला जाऊ शकत नाही. मात्र शासकीय अभिलेखागारातील एखादे पत्र गहाळ होणे ही गंभीर स्वरूपाची बाब आहे. याबाबत कार्यालय प्रमुखाने महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ६ व ९ अंतर्गत प्रशासकीय स्तरावर चौकशी करुन जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यावर जबाबदारी निश्चित करुन योग्य ती कार्यवाही करावी व त्याचा अहवाल आयोगास सादर करावा. " या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २३.०७.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिल क्र. १६२/२०२० मध्ये दि. १४.०२.२०२२ रोजी पारित आदेशात सहायक वाहतुक अधिक्षक रा. प. गोंदिया आगार यांच्या मनमानी कारभार व पक्षपातीपणामुळे रा. प. गोंदिया आगारातील महिला वाहकामध्ये निर्माण झालेला असंतोष दुर करण्याबाबत प्राप्त झालेली तक्रार पाठवित असल्याबाबत या विषयाचे पत्र आगार व्यवस्थापक रा.प. गोंदिया यांच्याव्दारे विभाग नियंत्रक, रा. प. भंडारा यांना त्यांचे आगारातील जावक नोंदवहीमध्ये अनुक्रमांक ८५० मध्ये नोंद आहे. त्या जावक नोंदवही अनुक्रमांक ८५०, दि. ३०.०८.२०१७ अन्वये पाठविली आहे, त्या पत्राच्या प्रतीची माहिती मागितली.

तसेच अपिल क्र. १६२/२०२० मध्ये दि. १४.०२.२०२२ रोजी पारित आदेशात सहायक वाहतुक अधिक्षक, रा. प. गोंदिया आगार यांच्या कामगिरीबाबत, या विषयाचे पत्र आगारातील जावक नोंदवहीमध्ये अनुक्रमांक ७६९, मध्ये नोंद आहे. दि. ०९.०८.२०१७ रोजी त्या जावक नोंदवही अनुक्रमांक ७६९ अन्वये पाठविली आहे. त्या पत्राच्या प्रतीबाबत माहिती मागितली आहे. नमूद पत्रामधील माहिती प्रदान न केल्यामुळे/अभिलेख गहाळ होणे याबाबत प्रमुख दखल घेत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ६ व ९ नुसार प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करून आयोगास अहवाल सादर करावा, असे नमूद केले. त्यावर अपिलार्थी यांनी सदर प्रकरणी केलेली कार्यवाही धूळखात असून अपिल क्र. १६२/२०२०,१६३/२०२० दोन्ही प्रकरणात स्वतंत्रपणे कार्यवाही करणे अपेक्षित असतांना दोन्ही प्रकरण एकत्र करून चूकीचा अहवाल आयोगास सादर केला असल्याचा दावा करित तक्रार अर्ज दाखल केला आहे. आयोगाच्या वतीने दि. ३०.१२.२०२२ रोजी जारी करण्यात आलेल्या पत्राच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन भंडारा, वाहतूक परिमंडळ, भंडारा यांच्याकडून प्राप्त अहवालाची प्रत अपिलार्थी यांना प्रदान करण्यात आली. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाचे अनुपालन करून दि. १८.०६.२०२२ रोजी कार्यालयातील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना साध्या डाकेने पाठवून प्रदान करण्यात आली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ६ व ९ नुसार प्रशासकीय स्तरावर चौकशी करून सदर चौकशीअंती श्री. अर्पित वासनकार गोंदिया आगार, लिपिक टंकलेखक व सौ. निशा थोटे, वरिष्ठ लिपिक यांना जबाबदार धरुन श्री. वासनकर व श्रीम. थोटे यांना दि. ०९०५.२०२२ अन्वये, आरोपपत्र बजावण्यात आले. सदर प्रकरणी समक्ष कार्यवाहीची चौकशी सुरु आहे. तसेच तत्कालिन आगर प्रमुख श्री.जयकुमार इंगोले यांना जबाबदार धरुन दि. १२.०४.२०२२ व दि. ०९.०५.२०२२ नुसार उपमहाव्यवस्थापक नियंत्रक समिती यांना अहवाल सादर केला असल्याचे विभाग नियंत्रक, राज्य परिवहन भंडारा यांनी नमूद केले आहे. ही बाब लक्षात घेता, आयोगाच्या दि. १४.०२.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार विभाग नियंत्रक, राज्य परिवहन भंडारा यांनी उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती नागपूर यांना अहवाल सादर केला आहे. आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले असून कथित रूपाने गहाळ झालेले अनुक्रमांक ८५०, ७६९ याबाबत सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ अंतर्गत योग्य ती प्राथमिक चौकशी केल्यानंतर योग्य प्रशासकीय पातळीवर गैरशिस्त व दत्तरी दाखल करण्याबाबत कसूर करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यावर जबाबदारी ठेवण्यात आली असून, कार्यवाही सुरु आहे. ही बाब लक्षात घेता, वरील दोन्ही आदेशाचे अनुपालन झाले असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

सत्यमेव जयते

**ठिकाण-नागपूर**
**दिनांक-२९.०३.२०२३**

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

जा.क्र. 3591 दि.

- 8 JUN 2023